REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER – 2017

# करवीरचे छत्रपती संभाजी आणि पोर्तुगीज संबंध : एक अध्ययन (इ.स. 1714 ते 1760)

**Dr. Mrs. Afroz H. Sheikh**
**Officiating Principal & HOD of History , Shri Binzani City College , Umrer Road, Nagpur.**

## प्रस्तावना :

इ.स. 1714 मध्ये कोल्हापूरच्या राजवाड्यात सत्तांतर होऊन महाराणी ताराबाई व तिचा पुत्र यांची सत्ता गेली आणि राजसबाई पुत्र संभाजी कोल्हापूरचा गादीवर आले. या सत्तांतरामागे रामचंद्रपंत अमात्याच्या हात असल्याची विश्वनीय माहिती पोर्तुगीजांना कळल्याने गोव्याच्या व्हाइसरॉयने 11 डिसेंबर 1714 रोजी रामचंद्रपंत अमात्यांना पत्र पाठवून सत्तांतर घडवुन आणल्याबद्दल अभिनंदन केले.[1]

कोल्हापूरच्या गादीवर संभाजी महाराज आल्याने पोर्तुगीजांना फार आनंद झाला. पोर्तुगीज व्हाइसरॉयने संभाजीला अभिनंदन पत्र लिहले त्यात ताराबाईच्या कारकिर्दीत पोर्तुगीज प्रजेची सतत लुटमार झाली. संभाजी महाराज कोल्हापूरच्या गादीवर आल्यामुळे पोर्तुगीज प्रजेची लुटमार होणार नाही.[2] अशी आशा व्यक्त केली. 19 जानेवारी 1715 रोजी संभाजीने गोव्याच्या व्हाइसरॉयला पत्र पाठवून ''मी राज्यकारभार करीत आहे व माझेच हुकूम पाळण्यात येत आहे.'' असे कळविले होते.[3]

कोल्हापूरकर संभाजी व पोर्तुगीज यांचे परस्पर संबंध अतिशय गुंतागुंतीचे होते. ताराबाईने पोर्तुगीजासंबंधी जे विरोधाचे धोरण स्विकारले होते तेच संभाजीने सुरू ठेवले होते. छत्रपती संभाजीच्या आरमाराने पोर्तुगीजांच्या जहाजावर हल्ले सुरू केल्याने पोर्तुगीजांनी संभाजीला पत्र पाठवून नाराजी व्यक्ती केली.

मेलुंदीच्या (सिंधदुर्ग) नावीक तळवरून संभाजीच्या आरमारांकडून पोर्तुगीजांच्या नौकांवर हल्ले होत असे. हे हल्ले थांबावे म्हणून वाटाघाटी करण्यासाठी श्रीनिवासपंत यांना गोव्याला पाठवावे अशी मागणी गोव्याच्या व्हाइसरॉयने रामचंद्रपंत अमात्याकडे केली.[4] सिंधुदुर्गचा किल्लेदार व श्रीनिवासपंत या दोघांनीही गोव्याला जाण्याच्या परवान्याची मागणी व्हाइसरॉय कडे केली होती. व्हाइसरॉयने श्रीनिवासपंत ला परवाना पाठविला होता पण मेलुंदीचा किल्ला हा आपल्या मालकीचा असल्याने श्रीनिवासपंतशी कोणत्याही वाटाघाटी करू नये.[5] अशी सुचना संभाजी महाराजांनी पोर्तुगीज व्हाइसरॉयला केली. त्यामुळे श्रीनिवासपंताशी व्हाइसरॉयने कोणत्याही वाटाघाटी केल्या नाही. गोव्याचे व्हाइसरॉयने छत्रपती संभाजी महाराजांना पत्र लिहले त्यात ''आंगरे तुमचे स्वामित्व मानीत नाही तेव्हा तुम्ही जर त्यांची खोड मोडण्याचे ठरविले तर आम्ही तुम्हाला जरूर मदत करू तसेच विजयदुर्ग घेण्याचा बेत केला तर आम्ही तुम्हाला आरमारी मदत करू.[6] असे आश्वासन दिले.

छत्रपती संभाजी व पोर्तुगीज यांच्यात 23 मार्च 1716 रोजी तह झाला. या तहाच्या पुर्व तयारीसाठी संभाजी महाराजांनी हरीपंत नावाचा वकील गोव्यास पाठविला होता.[7]

## तहाची कलमे :–



1) संभाजी राजे यांनी आंगऱ्यांनी बळकावलेले त्यांचे उत्तर किनाऱ्यावरील किल्ले आणि जलदुर्ग विशेषकरून ग्रियेचा किल्ला घेण्यासाठी आंगऱ्यांशी युद्ध करावे, हे राज्य त्यांना या मोहिमेत मदत करील.

2) मेलुंदीच्या म्हाताऱ्या किल्लेदाराने या राज्याच्या काही प्रजाजनांची जहाजे बळकावली होती. संभाजी राजे गादीवर आले तेव्हा त्याच्या ताब्यात ही जहाजे आली नाहीत. त्यातील काही जहाजे मेलुंदीच्या बंदरात आहेत असे कळते. परंतु ती जहाजे जरी तेथे नसली तरी त्याऐवजी इतर राष्ट्राची जी जहाजे बळकावण्यात आली त्यातील जहाजे या राज्याला देण्यात यावी.

3) या राज्याचा आणि मेलुंदीच्या नागरिकांचा व्यापार जमिनीवरून तसाच

समुद्रमार्गाने अनिर्बंधपणे सुरू व्हावा.

4) या राज्याच्या नौकांना समुद्रावर अनिर्बंधपणे संचार करता यावा. मेलुंदीच्या युद्ध नौकांकडून त्यांना उपद्रव होऊ नये अथवा त्यांना अटक करू नये. गोव्याच्या नौकांजवळ त्या मुलुखाच्या सेनापती अथवा बंदराच्या कप्तानाचे परवाने असतील. दक्षिणेकडील नौकाजवळ कप्तानाचे अथवा बखारवाल्यांचे परवाने असतील. संभाजी राजे यांची जी जहाजे व्यापारासाठी ह्या राज्यांच्या बंदरात येतील त्यांच्या जवळही परवाने असतील कुठल्याही नौकांना ह्या किंवा त्या राज्याची नांगरपट्टी भरावी लागणार नाही.
5) या राज्याच्या नौकांना कारणपरत्वे मेलुंदीच्या किंवा संभाजी राजे ह्यांच्या राज्यातील इतर बंदरात जाता येईल ही सवलत संभाजी राजे ह्यांच्या नौकांना पोर्तुगीज राज्याच्या बंदरात मिळेल.
6) संभाजी राजे व आंगरे यांचे युद्ध जुंपले तर संभाजी राजे ह्यांनी ह्या राज्याकडे दारूगोळ्याची मदत मागीतल्यास ती हे राज्य त्यांना देईल.
7) कुडाळचे सरदेसाई नारबा सावंत भोसले हे जरी ह्या राज्याचे मित्र असले आणि ते जरी ह्या राज्याला खंडणी देत असेल तरी संभाजी राजे व भोसले यांचे युद्ध झाल्यास पोर्तुगीजांनी भोसल्यांना मदत करू नये.
8) मेलुंदीच्या नागरिकांनी जर आपली जहाजे ह्या राज्याच्या आरमारा बरोबर उत्तरेकडे पाठवायची असतील तर ती त्यांना पाठविता येतील तसेच ह्याच आरमाराच्या संरक्षणात त्यांना माघारी परतता येईल.
9) संभाजी राजे यांच्या जहाजांना बसरा किंवा कागोहून घोडे आणायचे झाल्यास त्यांना पोर्तुगीजांचे परवाने बाळगावे लागतील. ज्या जहाजांपाशी हे परवाने नसतील ती जहाजे पोर्तुगीज युद्ध नौकाकडून बुडविली गेल्यास त्याची जबाबदारी पोर्तुगीजांवर राहणार नाही. ही काळजी घेण्याचे कारण की मस्कतच्या इमामाशी पोर्तुगीजांचे युद्ध चालु असल्याने त्यांच्याशी व्यापार करणारी राष्ट्रे पोर्तुगीजांचे शत्रु आहेत असे ते मानतात.

या तहामुळे करवीरकर छत्रपती संभाजी महाराज व पोर्तुगीज यांच्या संबंधांना कलाटणी मिळाली. या तहानुसार कोल्हापूरकर संभाजीने आंगरेच्या विरूद्ध मोहीम आखली तर संभाजीला मदत करण्याचे आश्वासन पोर्तुगीजांनी दिले.[9] आंगऱ्यांचा प्रदेश घेण्याची परवानगी संभाजीला दिली.[10] संभाजीने पोर्तुगीजांच्या जहाजांना आपल्या बंदरात जाऊ देण्याची परवानगी दिली तसेच सावंतवाडीकर व कोल्हापूरकर यांच्यात युद्ध झाल्यास पोर्तुगीज सावंतवाडीकरांना मदत करणार नाही असे आश्वासन पोर्तुगीजांनी छत्रपती संभाजीला दिले. तहाच्या कलमावरून असे दिसुन येते की, छत्रपती संभाजी महाराजाच्या प्रतिष्ठेचा विचार करूनच हा तह करण्यात आला होता. शाहू महाराजांच्या मोहिमांना शह देण्यासाठी शस्त्रसामुग्री मिळविण्याच्या व सौंधेचा राजा व सावंतवाडीकर यांच्यावर दडपण आणण्याच्या उद्देशाने संभाजी महाराजांनी हा करार केला होता.[11]

कुडाळच्या नारबा सावंताचा नाश करण्याचा संभाजीने निश्चय केला. ही मोहीम यशस्वी व्हावी म्हणुन संभाजीने पोर्तुगीजाकडे मित्र या नात्याने मदतीची मागणी केली.[12] त्यामुळे पोर्तुगीजांना आनंद झाला. पोर्तुगीज संभाजीला मदत देण्यास तयार झाले आणि वाटाघाटी करण्यासाठी आपण हिंदुराव घोरपडे यांना अधिकार पत्र देवुन गोव्यास पाठवावे असे संभाजी महाराजांना कळविले.[13] परंतु वाटाघाटी होण्यापुर्वीच कोल्हापूरकर संभाजीचे सरदार पिराजी घोरपडे व रामराव हे दोघेही नारबा सावंताच्या प्रदेशावर हल्ला करण्यासाठी गोव्याच्या सरहद्दीवर येवुन दाखल झाले. त्यांचा हेतू गोव्यात शिरण्याचा आहे असा सुगावा व्हॉइसरॉयला लागला त्यामुळे त्याने बार्देश व साष्टी येथे सैन्य पाठविण्याची व्यवस्था केली.[14] पिराजी घोरपडे व रामराव यांनी साष्टी प्रांतात आक्रमण केले. साष्टीतील सोन्या चांदीच्या दागिन्यांची मोठी लुट केली. मडगांव कुकळळी आणि वेरडे ही गावे लुटली. नावेलीचे श्रीमंत चर्च त्यांनी लुटून नेले.[15] गोव्याच्या व्हाइसरॉयने संभाजी महाराजांना पत्र पाठवून त्यांच्या सरदाराकडुन गोवा राज्यात झालेल्या आक्रमणाचा निषेध केला. आणि रामरावांनी केलेली लूट आम्हास परत करावी व रामरावांना त्याच्या गुन्हाबद्दल शिक्षा करावी. त्यानंतर आम्ही तुम्हाला कुडाळच्या सावंता विरूद्ध मदत करू. अशा आशयाचे पत्र पाठविले.[16] छत्रपती संभाजी व हिंदूराव घोरपडे यांना ही वार्ता कळताच त्यांनी गोव्याच्या गव्हर्नरला पत्र पाठवुन खुलासा केला की, पिराजी घोरपडे व रामराव यांनी साष्टी प्रांतात जे आक्रमण केले त्याला आमची संमती नव्हती. या घटनेबद्दल आम्ही रामरावास शिक्षा करू असे आश्वासन दिले.[17]

गोव्याचे गर्व्हनरने अशाच आशयाचे पत्र संभाजी महाराजांचे सरदार हिंदुराव घोरपडे यांना पाठविले कि, संभाजी राजे आणि आपण रामरावास शिक्षा करण्याचे मला आश्वासन दिले परंतु आश्वासनाने समाधान होणे शक्य नाही. रामरावांनी जी लूट केली ती आम्हाला परत मिळाली पाहिजे तरच आम्ही आपणाशी मैत्री ठेवू आणि कुडाळच्या सावंता विरूद्ध मदत करू.[18] संभाजी महाराजांना गोवा राज्याने मदत द्यावी की देऊ नये हा प्रश्न गर्व्हनरने गोव्याच्या सल्लागार मंडळासमोर नेला तेव्हा संभाजी राजे यांना गोवा राज्याने नारबा सावंत विरूद्ध मदत देवू नये. असे मत राज्य सल्लागार मंडळाने प्रकट केले.[19]

इ.स. 1724 मध्ये संभाजी राजे यांनी आपल्या सरदारांशी विचार विनिमय करून 12 डिसेंबर 1724 साष्टीवर हल्ला करण्याचा निर्णय घेतला. या स्वारीबाबत संभाजी महाराजांचे सरदार रामराव व पिलाजी जाधव यांनी संभाजी महाराजांना सांगितले की, ''ही मोहीम जर सुरू केली तर त्यात यश मिळण्याची शक्यता फारच कमी आहे.[20] पण संभाजी महाराजांनी आपल्या स्वारीचा निर्णय बदलविला नाही. ही बातमी पोर्तुगीजांना कळताच त्यांच्या अधिकाऱ्यात गोंधळ उडाला. सौंधेच्या राजाने करवीकरांची थकलेली खंडणी अद्याप दिली नाही. म्हणुन संभाजीने सैन्यासह सामराणीच्या किल्ल्यास वेढा घातला.[21] संभाजी महाराजांचे सैन्य साष्टी प्रांतावर

आक्रमण करणार अशी माहीती पोर्तुगीजांना मिळताच करवीरच्या फौजाच्या संभाव्य स्वारीपासून साष्टी प्रांताचे संरक्षण करण्यासाठी पोर्तुगीजांनी सक्तीची लष्कर भरती सुरू केली.[22] करवीरकर संभाजीच्या फौजा घाट उतरून येत असल्याची बातमी साष्टीच्या सेनापतीस कळताच त्याने करवीरकर संभाजीशी लढण्यासाठी सौंधेच्या राजाशी हातमिळवणी केली आणि करवीरकरच्या सैन्याला घाटात अटकाव करण्याची योजना आखली पण ही योजना पोर्तुगीज गर्व्हनरला अव्यवहार्य वाटली.[23]

इ.स. 1726 मध्ये सौंधेच्या राजाचे पारिपत्य करण्यासाठी संभाजी महाराज गोव्याच्या सरहद्दीवर सैन्यासह आले असता ते गोव्यावर स्वारी करणार अशी अफवा गोव्यात पसरली त्यामुळे पोर्तुगीजाकडे घबराट निर्माण झाली. संभाजी महाराजांचे सैन्य जांबावली मार्गे साष्टीत उतरणार असल्याची बातमी गोव्याच्या व्हाइसरॉयला कळल्याने त्याने जांबावलीच्या सुभेदाराला खडसावून सांगितले की, शत्रु सैन्याने जांबावलीच्या त्याच्या अमलाखालीत प्रदेशातून येऊन आमच्या प्रदेशावर स्वारी केली. तर हे कृत्य शत्रुत्वाचे समजून त्याला जबाबदार धरले जाईल व त्याचा बदला म्हणुन आम्ही त्यांच्या प्रदेशात सैन्य घुसवू.[24] यावरून असे दिसून येते की करवीरकर संभाजीच्या स्वारीमुळे पोर्तुगीज धास्तावलेले होते. त्यामुळे त्यांनी साष्टीच्या सेनापतीस चर्चमधील सोने, चांदी, मौल्यवान वस्तु, जनावरे सुरक्षित ठिकाणी ठेवण्याचा सुचना दिल्या होत्या. संभाजी महाराजांचे सैन्य साष्टीजवळ आल्याने गोव्याच्या व्हाइसरॉयने 6 डिसेंबर 1726 रोजी मडगावच्या रक्षणासाठी लोखंडी अडसर उभारावी अशी सुचना साष्टीच्या सेनापतीस केली. आणि साष्टीच्या सेनापतीच्या मदतीला गोवा सैन्याची कुमक पाठविली.[25] पण संभाजीने गोव्यावर स्वारी केली नाही. त्यामुळे पोर्तुगीजांनी सुटकेचा श्वास सोडला. यानंतर चार–पाच वर्षे करवीरकर संभाजी व पोर्तुगीज यांचे संबंध नरम–गरमच राहीले. मोठ्या संघर्षाचा प्रश्न उद्‌भवला नाही.

संभाजी महाराज निजामाला जाऊन मिळाले व शाहु महाराजांच्या प्रदेशाला उपद्रव देणे सुरू केले. त्यामुळे संभाजीला पोर्तुगीजांकडे लक्ष देता आले नाही. छत्रपती संभाजी व छत्रपती शाहू यांच्यात गृह युद्ध सुरू होते. दोघांच्याही फौजा एकमेकांच्या अमलाखालील प्रदेशात जाऊन लुटमार व जाळपोळ करीत होत्या. त्याची झळ पोर्तुगीजांना बसत होती. इ.स. 1727 ते 1739 या सात वर्षाच्या काळात संभाजी महाराजांनी गोव्याच्या व्हाइसरॉयला एकही पत्र पाठविले नाही असे दिसुन येते. गेल्या सात वर्षापासून मी इकडे आहे परंतु या कालावधीत आपले एकही पत्र येण्याचे भाग्य माझ्या वाट्याला आले नाही.[26] असे गोव्याचे व्हाइसरॉयने संभाजी महाराजांना म्हटले आहे.

छत्रपती शाहु व छत्रपती संभाजी यांच्यात वारणेचा तह होण्यापूर्वी जे संघर्षाचे प्रसंग उद्‌भवले त्याची झळ पोर्तुगीजांच्या अमलाखालील प्रदेशाला बसली. दोन्ही बाजुच्या सैन्याची आक्रमणे पोर्तुगीज प्रदेशात होत असे. वारणेचा तह होवुन दोन्ही छत्रपती मधील वाद संपला. छत्रपती शाहु व संभाजी यांचे राज्य वेगळे झाले. संभाजी महाराजांचे राज्य कर्नाटकच्या शेवटचा सीमेपर्यंत पोहचले होते.[27] पोर्तुगीजांनी संभाजी महाराजांचे मांडलीकत्व मान्य केले नाही. व खंडणीही भरली नाही. तसेच संभाजी महाराजांनी आपले मांडलीकत्व पत्करण्यास सक्तीही केली नाही.[28] पण पोर्तुगीज आपले मांडलीक आहे असा दावा मात्र छत्रपती संभाजी महाराज करीत असे.

पोर्तुगीजांनी 2 मे 1739 रोजी पेशव्यांशी तह केला.[29] 12 मे 1739 रोजी चिमाजी आप्पाने वसईचा किल्ला जिंकुन घेतला व पोर्तुगीजांवरील मोहीम यशस्वी झाली.[30] याचवेळी पोर्तुगीजांचा वकील रंगो नारायण शेणवी याचा कोल्हापूरास मुक्काम होता.[31] त्याने संभाजी महाराजास सांगितले की, व्हाइसरॉय आपल्याशी मैत्री ठेवु इच्छितात यावर संभाजी महाराजांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. हेच जर मला अगोदर कळले असते तर यापुर्वीच आवश्यक ती बोलणी केली असती.[32] यानंतर संभाजी महाराज पोर्तुगीजांना मदत करण्यासाठी मालवण पर्यंत गेलेही होते.[33]

गोव्याच्या व्हाइसरॉयने संभाजी महाराजांना बाजीराव पेशव्या विरूद्ध मदत मागितली. संभाजी महाराजांनी करवीर व गोवा यांचे मैत्रीचे संबंध लक्षात घेवुन आणि आपल्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी हिंदुराव घोरपडे यांना फौज सहीत गोव्याकडे पोर्तुगीजांच्या मदतीला जाण्याची आज्ञा केली.[34] व सुमंत रामचंद्रबाबा यांना आवश्यक अधिकार सैन्य व इतर सामुग्री देवुन पोर्तुगीजांच्या मदतीला गोव्यास पाठविले.[35] याचवेळी संभाजी महाराजांनी गोव्याच्या राज्य सचिवास पत्र लिहुन कळविले की, रामचंद्रबाबास सैन्यासह गोव्यात पाठविले आहे. त्यांना सर्वप्रकारे मदत करावी.[36] व गोवा प्रांत पेशवा बाजीरावाच्या हाती जाऊ नये असे संभाजी महाराजांना वाटत होते.

सौंधेचा प्रदेश संभाजी महाराजांच्या कक्षेत येत असल्याने संभाजी महाराजाचे सरदार सौंधेच्या राजाला मदत करण्यासाठी गोव्यात आले. त्यांनी गोव्यातील नद्यांची पाहणी केली. गोव्याच्या सरहद्दीचे नकाशे गोळा केले. गोव्याच्या सरहद्दीचे नकाशे त्यांच्या जवळ आहे हे जेव्हा पोर्तुगीजांना कळले तेव्हा धोक्याची परिस्थिती लक्षात घेवुन गोव्याचा सीमा त्यांनी बळकट केल्या.[37] म्हणजे संभाजी महाराज गोव्यावर आक्रमण करेल याची भीती पोर्तुगीजांना वाटत होती.

पुणेकरांना फोंड्याचा किल्ल्यावरून हाकलुन लावण्यासाठी पोर्तुगीजांनी संभाजी महाराजांना येवुन मिळावे म्हणुन अनेकदा विनंती केली होती पण पोर्तुगीजांचा पुणेकरांशी तह व्हायचा आहे हे कारण पुढे करून संभाजी महाराजांना मदत करण्याचे टाळले आणि प्रत्यक्ष जेव्हा तहावर सह्या झाल्या तेव्हा आपण तटस्थता स्विकारणार असल्याचे पोर्तुगीजांनी जाहीर केले. त्यामुळे संभाजी महाराज पोर्तुगीजांवर नाराज झाले. संभाजी महाराजांनी फोंड्याचा सुभेदार नारो चिमणजीवर हल्ला करून कुकळळी, व असोळणे ही ठाणे घेण्यासाठी स्वारी करणार होते.[38] त्यामुळे कुकळळी व असोळणे मिळविण्यासाठी पोर्तुगीजांनी पुणेकरांकडे तगादा लावला आणि

नारो चिमणजीचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. ही ठाणी जर संभाजी महाराजांनी घेतली तर पोर्तुगीजांचे फार मोठे नुकसान होणार होते. त्यामुळे हे नुकसान टाळण्यासाठी आपण संभाजी महाराजांना जाऊन मिळावे असे पोर्तुगीजांना वाटत होते.[39]

संभाजी महाराजांनी पोर्तुगीजांशी असलेली मैत्री वाढविण्यासाठी सतत प्रयत्न केले आणि पोर्तुगीजांनीही संभाजी महाराजांबरोबर मैत्री टिकावी, दोन्ही राज्याच्या व्यापारात वाढ व्हावी अशी सदिच्छा व्यक्त केली. आणि बाळु शेणवी याला संभाजी महाराजांचे मंत्री रामचंद्रबाबाजी यांच्याकडे पाठविले आणि वाटाघाटी करण्यासाठी एखादा दूत पाठवावा असे कळविले होते.[40]

इ.स. 1741 मध्ये संभाजी महाराजांनी संताजी जाधव व रूद्राजी शिंदे यांना पत्र देवुन व्हाइसरॉय कडे पाठविले. सोबत भेट म्हणुन कापडाचे तागे पाठविले होते. त्याचा व्हाइसरॉयने आवडीने स्वीकार केला आणि संभाजी महाराजांना सुख सौख्य प्राप्त होवो अशी इच्छा व्यक्त केली.[41]

गोविंदराम ठाकुर हा पेशव्याचा सरदार छत्रपती संभाजी कडे आला आणि त्याने संभाजींना न विचारता साष्टीवर हल्ला केला. त्यामुळे संभाजी महाराज नाराज झाले. संभाजी महाराजांनी पोर्तुगीजांना पत्र पाठवुन गोविंदराम ठाकुरला जे शासन केले त्याबद्दल समाधान व्यक्त केले.[42] सौंधेच्या राजाचा मंत्री कलप्पा संभाजी महाराजांच्या मागण्या पुर्ण करण्यास तयार आहे. आणि सौंधेचा राजा व संभाजी महाराज यांच्यात समेट घडवुन आणण्याचा प्रयत्न करीत आहे. असे संभाजी महाराजांना पोर्तुगीजांनी कळविले.[43] तसेच आपणविषयी आम्हाला किती प्रेम वाटते हे लिहण्याचे कारण नाही. देव आपणास सदैव सुखासमाधानात ठेवो अशी इच्छा व्यक्त करतो.[44] पोर्तुगीजांनाही संभाजी महाराजांच्या मैत्रीची आवश्यकता होतीच त्यामुळे त्यांनीही वारंवार संभाजीला मैत्री दृढ करण्यासाठी पोर्तुगीजांनी अनेक पत्रे पाठवुन विनंती केली. आणि आपणा विषयी आम्हाला किती प्रेम वाटते ते आपणाला लिहिण्याची गरज नाही. ''देवाने आपणास सुखसमाधानास ठेवावे व सदा सर्वकाळ आपणास सुख समाधान प्राप्त होवो. अशी इच्छा व्यक्त करतो.''[45]

छत्रपती संभाजी महाराजांचे 20 डिसेंबर 1760 मध्ये निधन झाले. ही वार्ता गोव्याच्या व्हाइसरॉयला कळली तेव्हा त्याने छत्रपती संभाजी महाराजांची राणी जिजाबाईस दुखवट्याचा संदेश पाठविला. ''श्रेष्टतम महाराजांच्या शोचनीय निधनाची वार्ता ऐकून मनस्वी दुःख झाले. या वैभवशाली राज्याचे व त्यांचे संबंध उत्कृष्ट मैत्रीचे होते. तरी आपणाशी आमचे संबंध पुर्वीसारखेच मैत्रीचे राहतील.[46] या शब्दात केली आहे. यावरून पोर्तुगीजांनाही संभाजी महाराजांसारखा मित्र पाहिजे होता, असे दिसुन येते.

1) पिसुर्लेकर पां. स. ''मराठ्यांच्या इतिहासाची साधने'' पोर्तुगीज दप्तर खंड 3.65.
2) पोर्तुगीज मराठे संबंध 110.
3) शिरोडकर प्र. प्रा. ''कोल्हापूर पोर्तुगीज संबंध'' 20, प्रकाशन वर्ष 1978.
4) पोद 3. 131, (मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पोर्तुगीज दप्तर.)
5) देसाई सं. शं. ''करवीरचे छत्रपती आणि पोर्तुगीज'' 9, प्रकाशन वर्ष 1978.
6) ताकाका 1, 312, (ताराबाई कालीन कागदपत्रे.)
7) पोद 3, 165.
8) कित्ता 166.
9) ताकाका 1, 312.
10) पोर्तुगीज मराठे संबंध 141.
11) गर्गे स. मा. ''करवीर रियासत'' 113, प्रकाशन वर्ष 1768.
12) पोद 3, 197.
13) कित्ता 197.
14) ताकाका 1, 326.
15) पोमस 174.
16) पोद 3, 213.
17) कछपो 12 (करवीरचे छत्रपती आणि पोर्तुगीज)
18) पोद 3, 214.
19) ताकाका 1, 328.
20) कछपो 15.
21) कित्ता 35.
22) कछपो 17.
23) पवार आप्पासाहेब ''ताराबाई कालीन कागदपत्रे'' खंड 2, 46.
24) पोद 3, 243, कछपो 17.
25) कछपो 19.

26) कदम माधव ''असा हा सिंधदुर्ग'' 47, प्रकाशन वर्ष 2000.
27) कछपो 18.
28) Malogaonkar M. 'Portuguese and Maratha' 308.
29) कित्ता 308.
30) गुजर मा. सी. 'करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने' भाग 8, 20, प्रकाशन वर्ष 1965.
31) डॉ. पिसुर्लेकर पा. स. 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने'.
32) वीर 156.
33) गर्गे स. मा. 'करवीर रियासतीची कागदपत्रे' खंड 4, पृ. 3, प्रकाशन वर्ष 1982.
34) पोद 2, 30.
35) Purtugures and Maratha', P. 430.
36) ताकाका 2, 250.
37) Purtugures and Maratha', 430.
38) शिरोडकर प्र. प्रा. (संपा) कोल्हापूर पोर्तुगीज संबंध (1978) पृ. क्र. 32.
39) कछपो 22.
40) कित्ता 28.
41) कछपो 32.
42) कित्ता 31.
43) कित्ता 32.
44) 'पोर्तुगीज मराठे संबंध' 214.
45) कित्ता 32.
46) पवार आप्पासाहेब 'ताराबाई कालीन कागदपत्रे', खंड 3, 160.